


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १७३। किंमत - ४ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शनिवार १८/०७/२०२६ । पाने - ६




# आगार प्रमुख बदलीवर; संगमनेर बसस्थानक वाऱ्यावर !

## गुंडांची दहशत, स्वच्छतेचा बोजवारा, प्रवाशांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील महत्त्वाचे आणि भव्य-दिव्य म्हणून ओळखले जाणारे संगमनेर बसस्थानक सध्या प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गंभीर समस्यांच्या विळख्यात सापडले आहे. आगार प्रमुख श्री. गुंड यांची बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी केवळ तात्पुरता पदभार कनिष्ठ अधिकाऱ्याकडे देण्यात आल्याने बसस्थानकात जबाबदार प्रशासनाचा अभाव निर्माण झाला आहे. परिणामी स्वच्छता, सुरक्षा आणि प्रवासी सुविधांचा अक्षरशः बोजवारा उडाला असून प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

बसस्थानक परिसरात अल्पवयीन नशेडी तरुण आणि गुंडांच्या टोळ्यांनी अक्षरशः उच्छाद मांडल्याची तक्रार प्रवाशांकडून वारंवार केली जात आहे. रात्रीच्या वेळी हातात धारदार शस्त्रे, लोखंडी कडे आणि काठ्या घेऊन काही टोळक्या प्रवाशांना धमकावत असल्याचे सांगितले जात आहे. अनेकदा प्रवाशांना मारहाण करून त्यांच्याकडील रोख रक्कम, मोबाईल आणि मौल्यवान वस्तू हिसकावून नेण्याचे प्रकार घडत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

गुरुवारी रात्रीही तीन ते चार जणांच्या टोळक्याने काही प्रवाशांना धमकावत पैसे आणि मोबाईल लुटण्याचा प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे. अशा घटना वारंवार घडत असूनही पोलीस यंत्रणा प्रभावी कारवाई करत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

बसस्थानकात पोलीस चौकी उभारण्यात आली असली, तरी दिवसाच्या वेळीही पोलीस किंवा सुरक्षारक्षक उपस्थित नसतात. रात्रीच्या वेळी तर प्रवाशांच्या सुरक्षेसाठी कोणतीही सक्षम व्यवस्था नसल्याने चोरटे आणि गुंडांचे फावले आहे. खिसेकापू, लुटमार आणि प्रवाशांना धमकावण्याच्या घटना वाढत असल्याने रात्री बसस्थानकात थांबणे धोकादायक बनले आहे.

(पान २ वर)

### पोलीस चौकी आहे... पण पोलीस कुठे?

**बसस्थानकात पोलीस चौकी उभारण्यात आली असली, तरी दिवसा पोलीस किंवा सुरक्षारक्षक दिसत नाहीत आणि रात्री तर परिस्थिती आणखी गंभीर असल्याची तक्रार आहे. खिसेकापू, लुटमार आणि प्रवाशांना धमकावण्याच्या घटना वाढत असताना पोलीस गस्त आणि प्रतिबंधात्मक कारवाई अपुरी असल्याचा आरोप होत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, काही गुन्हेगारांची माहिती यंत्रणेला असूनही प्रभावी कारवाई होत नसल्याने गुंडांचे मनोबल वाढत आहे. या आरोपांची स्वतंत्र पडताळणी होणे आवश्यक आहे.**

### तातडीच्या उपाययोजनांची मागणी

**प्रवाशांनी बसस्थानकात कायमस्वरूपी आगार प्रमुखाची नियुक्ती, २४ तास पोलीस बंदोबस्त, कार्यक्षम सीसीटीव्ही यंत्रणा, स्वच्छतागृहांची नियमित देखभाल, नशेखोर आणि गुंडांविरोधात विशेष मोहीम तसेच रात्रीच्या वेळी प्रवाशांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याची मागणी केली आहे. संगमनेर बसस्थानक हे शहराचे प्रवेशद्वार मानले जाते. मात्र आज हेच बसस्थानक प्रवाशांसाठी भीतीचे ठिकाण बनले आहे. स्वच्छतेसाठी व स्वच्छताग्रहांसाठी एसटी प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी. सुरक्षतेसाठी पोलीसदलाने पुरेसा बंदोबस्त ठेऊन प्रवाशांची चोर, गुंड यांच्यापासून मुक्तता करावी.**

# रोटरी डिस्ट्रीक्ट 3132 च्या असिस्टंट गव्हर्नरपदी आनंद हासे यांची निवड



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर

रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या रोटरी वर्ष २०२६-२७ साठी रो. आनंद किसन हासे यांची असिस्टंट गव्हर्नर म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्यावर रोटरी क्लब ऑफ शिर्डी साईबाबा, रोटरी क्लब ऑफ कोपरगाव सेंट्रल आणि रोटरी क्लब ऑफ अकोले सेंट्रल या तीन क्लबच्या मार्गदर्शन व समन्वयाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. रोटरी जिल्हा ३१३२ चे प्रांतपाल रो. जयेशभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली आनंद हासे हे या तीनही क्लबचे नेतृत्व विकास, वार्षिक नियोजन, सदस्यवाढ, द रोटरी फाउंडेशन, प्रभावी सेवा प्रकल्प तसेच जिल्ह्याच्या उद्दिष्टांशी सुसंगत कार्य करण्यासाठी मार्गदर्शन करणार आहेत.

आनंद हासे हे रोटरी क्लब ऑफ संगमनेरचे माजी अध्यक्ष असून त्यांच्या अध्यक्षीय कार्यकाळात त्यांनी 'फुलझडी', कोविड काळात पती गमाविलेल्या एकल महिलांना पीठ गिरणी वितरण, शिलाई मशीन वितरण यांसारखे नाविन्यपूर्ण, स्वयंपूर्ण आणि समाजाभिमुख प्रकल्प यशस्वीरीत्या राबविले. त्यांच्या नेतृत्वाखाली क्लबने आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक विकासाच्या क्षेत्रात अनेक उल्लेखनीय उपक्रम राबवून समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

व्यावसायिकदृष्ट्या आनंद हासे हे युवा पॉलीप्रिंट अँड पॅकेजिंग इंडस्ट्रीज तसेच दैनिक युवावार्ताचे संचालक आहेत. याशिवाय ते रोटरी आय केअर ट्रस्टचे विश्वस्त, महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सचे संचालक तसेच श्रीसंगम ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे संचालक म्हणूनही कार्यरत आहेत. उद्योग, सामाजिक बांधिलकी आणि सेवाभावी नेतृत्व यांचा समतोल साधत त्यांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. आपल्या निवडीबद्दल आनंद हासे म्हणाले, असिस्टंट गव्हर्नर म्हणून मिळालेली ही जबाबदारी माझ्यासाठी मोठा सन्मान असून त्याचबरोबर ती एक महत्त्वाची जबाबदारीही आहे. प्रांतपाल रो. जयेशभाई पटेल यांच्या संकल्पनेनुसार तिन्ही क्लबसोबत समन्वय साधून अधिक प्रभावी, शाश्वत आणि समाजोपयोगी प्रकल्प राबविण्यास प्राधान्य देणार आहे. त्यांच्या या निवडीबद्दल रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ तसेच सामाजिक, राजकीय, औद्योगिक, पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# राज्यात एसआयआर प्रक्रियेला मुदतवाढ

मुंबई (वृत्तसंस्था)- राज्यात विशेष सखोल मतदार यादी पुनरावलोकन प्रक्रियेला ८ दिवसांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिल्लीसह अनेक राज्यात डखठ प्रक्रियेला मुदतवाढ देण्याची मागणी होती. महाराष्ट्रातही डखठ प्रक्रियेला मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर राज्यात डखठ प्रक्रियेला ८ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली. पाऊस आणि इतर बाबींमुळे डखठ प्रक्रियेला वेळ वाढवून द्यावा अशी अनेक पक्षांनी मागणी केली होती. त्यानुसार केंद्रीय निवडणूक आयोगाने ८ दिवसाचा कालावधी वाढवून दिला आहे.दिल्लीतही एसआयआरला मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार एसआयआर प्रक्रियेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला. आता सुधारित कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार, १९ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल, यापूर्वी ही तारीख ७ ऑक्टोबर अशी होती. दिल्लीचे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी १४ जुलै रोजी अतिरिक्त वेळ देण्याची विनंती केली होती. त्यानंतर संपूर्ण एसआयआर प्रक्रियेतील विविध टप्प्यांच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे. दिल्लीत सुधारीत वेळापत्रकानुसार, बुथ लेव्हल अधिकारी ८ ऑगस्टपर्यंत घरोघरी जाऊन मतदार याद्यांची पडताळणी करतील.

# जिओ डिलरशिपच्या नावाखाली ८४ लाखांची फसवणूक

## फेसबुकवरील जाहिरातीवर ठेवलेला विश्वास ठरला घातक




युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -: जिओ पेट्रोल पंपाची डिलरशिप मिळवून देण्याचे आमिष दाखवत जामखेड येथील एका कृषी सेवा केंद्र चालकाची तब्बल ८४ लाख ५३ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. फेसबुकवरील आकर्षक जाहिरात, ई-मेल, व्हॉट्सॲपवरील संवाद, बनावट कागदपत्रे आणि कंपनीचे प्रतिनिधी असल्याचे भासवणाऱ्या व्यक्तींच्या माध्यमातून विश्वास संपादन करून ही फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक सागर ढिकले पुढील तपास करत आहेत.

फिर्यादीनुसार, जामखेड येथील कृषी सेवा केंद्र चालकाला ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी फेसबुकवर जिओ पेट्रोल पंप डिलरशिपची जाहिरात दिसली. जाहिरातीतील लिंकवर जाऊन त्यांनी आवश्यक माहिती भरत पाच हजार रुपये नोंदणी शुल्क भरले. त्यानंतर त्यांना नोंदणी पूर्ण झाल्याचा ई-मेल आला. पुढे पॅनकार्ड, आधारकार्ड, नेटवर्थ प्रमाणपत्र, जागेचा उतारा यांसारखी कागदपत्रे अपलोड करण्यास सांगण्यात आले. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर डिलरशिप मंजूर झाल्याचा संदेश देत मंजुरी क्रमांकही देण्यात आला.

विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी स्वतःला एस. एन. पांडे असे सांगणारी व्यक्ती आणि तिचा साथीदार प्रत्यक्ष जागेची पाहणी करून गेले. (पान २ वर)


### नागरीकांनो
**सावध रहा, सुरक्षित रहा...**









# अर्थ खात्यावरून महायुतीत वादंग

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात अर्थखात्याहून मोठे घमासान सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट अर्थखात्यासाठी आग्रही आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची याबाबत ते भेट घेणार आहेत. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अर्थखाते देण्यास एकनाथ शिंदे यांचा विरोध असल्याचे कळते. दिल्ली भेटीमध्ये त्यांनी अमित शाह यांच्यासोबत झालेल्या भेटीत अर्थखाते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला देण्याचा विरोध केला, अशी माहिती आहे. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थखाते आपल्याकडेच ठेवले. मात्र, जयंत पाटील यांनी मुख्यमंत्र्यांच्या घेतलेल्या भेटीनंतर आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस एनडीएमध्ये सहभागी होणार यानंतर शरद पवारांच्या पक्षाकडे अर्थखाते जाणार अशी जोरदार चर्चा आहे. यामध्ये महायुतीमध्ये अर्थखात्याहून एक घमासान सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेसाचे नेते आणि सुनेत्रा पवार याच मुद्द्यात मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहेत.यादरम्यानच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्ली दौऱ्यावर जाणार होते. मात्र, त्यांचा हा दिल्ली दौरा अचानक रद्द करण्यात आला. ११ वाजता एकनाथ शिंदे महाराष्ट्र सदन इथल्या कार्यक्रमाला ऑनलाईन हजेरी लावणार आहेत. त्यांचा दिल्ली दौरा नक्की का रद्द झाला, याबाबत काही माहिती मिळू शकली नाहीये. दोन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर एकनाथ शिंदे होते.काल एकनाथ शिंदे यांची जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड यांनी भेट घेतली.

## पान १ वरून - आगार प्रमुख बदलीवर...

सरकारने सार्वजनिक स्वच्छतागृह मोफत करण्याचा निर्णय घेतला असला, तरी संगमनेर बसस्थानकातील स्वच्छतागृहाच्या देखभालीची जबाबदारी कोणाकडेही नसल्याने त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. सर्वत्र दुर्गंधी पसरली असून स्वच्छतेचा पूर्ण अभाव आहे. हजारो प्रवासी आणि नागरिक या स्वच्छतागृहाचा वापर करत असताना त्याची योग्य देखभाल होत नसल्याने महिलांसह ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

याशिवाय बसस्थानक परिसरात भिकाऱ्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून परिसरात अस्वच्छता आणि बकालपणा वाढल्याचे चित्र आहे. बसस्थानकातील सीसीटीव्ही यंत्रणाही निकृष्ट आणि निष्प्रभ ठरत असल्याचा आरोप होत असून गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवण्यात ती अपयशी ठरत आहे.

नवीन बसस्थानक उभारल्यानंतर येथे शेकडो व्यापारी गाळे सुरू झाले असून दररोज हजारो प्रवाशांची वर्दळ असते. मात्र एवढ्या मोठ्या बसस्थानकात सुरक्षित वातावरण नसल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्री उशिरा बसमधून उतरलेल्या प्रवाशांना सुरक्षितपणे घरी जाण्याची कोणतीही व्यवस्था नाही. तसेच बसची प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांनाही रात्रभर सुरक्षित थांबता येत नसल्याची खंत व्यक्त होत आहे.

लोकप्रतिनिधी, परिवहन विभाग आणि पोलीस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हे आधुनिक बसस्थानक आज असुरक्षित बनल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी सुरक्षा व्यवस्था, पोलीस गस्त वाढविणे, कार्यक्षम सीसीटीव्ही यंत्रणा, स्वच्छतागृहांची तातडीने देखभाल आणि पूर्णवेळ जबाबदार आगार प्रमुखाची नियुक्ती करण्याची मागणी प्रवाशांकडून जोर धरत आहे.

संगमनेरसारख्या महत्त्वाच्या शहरातील बसस्थानकाची ही दुरवस्था तातडीने दूर करून प्रवाशांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे.

## पान १ वरून - जिओ डिलरशिपच्या नावाखाली सायबर ...

त्यानंतर शिंदे इंजिनिअर नावाने संपर्क करणाऱ्या व्यक्तीने लवकरच पेट्रोल पंपाचे काम सुरू होणार असल्याचे सांगत फिर्यादीचा पूर्ण विश्वास संपादन केला.

यानंतर सौरभ अग्रवाल नावाने संपर्क साधणाऱ्या व्यक्तीने व्हॉट्सअॅप, ई-मेल आणि विविध बँक खात्यांच्या माध्यमातून प्रोसेसिंग फी, विविध परवानग्या, शुल्क आणि इतर खर्चाच्या नावाखाली वेळोवेळी पैशांची मागणी केली. डिलरशिप मिळण्याच्या आशेने फिर्यादीने स्वतःच्या तसेच पत्नी आणि दोन मुलींच्या बँक खात्यांतून आरटीजीएस, एनईएफटी आणि यूपीआय व्यवहाराद्वारे ३१ ऑक्टोबर २०२५ ते ८ जुलै २०२६ या कालावधीत एकूण ८४ लाख ५३ हजार रुपये आरोपींनी सांगितलेल्या खात्यांमध्ये जमा केले.

मात्र, त्यानंतर पेट्रोल पंपाच्या कामाबाबत संपर्क साधला असता आरोपींनी फोन उचलणे बंद केले. वारंवार आश्वासने देऊनही कोणीही जागेवर न आल्याने आपली फसवणूक झाल्याची खात्री फिर्यादीला झाली.

डिलरशिप मिळेल, या आशेने काही काळ प्रतीक्षा केल्यानंतर अखेर १४ जुलै २०२६ रोजी फिर्यादीने राष्ट्रीय सायबर गुन्हे तक्रार पोर्टलवर ऑनलाइन तक्रार नोंदवली. त्यानंतर सायबर पोलीस ठाण्यात अधिकृत फिर्याद दाखल करण्यात आली असून या बहुचर्चित आर्थिक फसवणुकीचा तपास सुरू आहे.

सायबर पोलिसांचे आवाहन: सोशल मीडियावरील डिलरशिप, फ्रँचायझी किंवा मोठ्या गुंतवणुकीच्या आकर्षक जाहिरातींवर विश्वास ठेवण्यापूर्वी संबंधित कंपनीकडून अधिकृत पडताळणी करावी. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून मोठी आर्थिक रक्कम हस्तांतरित करू नये, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे.

# जिल्हा बँक निवडणुकीला उच्च न्यायालयात आव्हान

## सर्व प्रतिवादींना नोटिसा, औरंगाबाद खंडपीठात सुनावणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी संचालक मंडळ निवडणुकीच्या प्रक्रियेला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान देण्यात आले असून, न्यायालयाने सर्व प्रतिवादींना नोटिसा बजावत प्रकरणाची पुढील सुनावणी एका आठवड्यानंतर ठेवली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणूक प्रक्रियेवर अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे.

उंदीरगाव (ता. श्रीरामपूर) येथील शेतकरी व सहकारी संस्थेचे सभासद सतीश मांजबापू नाईक यांनी ही याचिका दाखल केली असून, त्यांच्यावतीने अॅड. अजित काळे यांनी बाजू मांडली. न्या. एस. जी. चपळगावकर यांच्या एकल पीठासमोर १५ जुलै रोजी या याचिकेवर सुनावणी झाली.

याचिकेत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने १५ जून २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकाला आव्हान देण्यात आले आहे. या परिपत्रकानुसार, थकबाकीदार सहकारी संस्थांनी आपल्या संचालकांऐवजी बिगर थकबाकीदार सदस्याला प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्याची अट घालण्यात आली आहे.

याचिकाकर्त्यांचा दावा आहे की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ७३सीए (१)(आय) हे केवळ संबंधित व्यक्तीला अपात्र ठरवते; संस्थेला नव्हे. त्यामुळे परिपत्रकाद्वारे कायद्यात नसलेली नवी अपात्रता निर्माण करण्यात आली असून, ती कायद्याच्या विरोधात आहे.

याचिकाकर्त्यांचे वकील अॅड. अजित काळे यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, निवडणूक प्राधिकरणाला कायद्याचा अर्थ लावण्याचा किंवा नवीन अपात्रता निर्माण करण्याचा कोणताही अधिकार नाही. हा अधिकार केवळ राज्य शासन किंवा न्यायालयांनाच आहे.

याचिकेत कर्जमुक्ती योजना २०२६चाही संदर्भ देण्यात आला आहे. या योजनेची अंमलबजावणी झाल्यानंतर अनेक थकबाकीदार शेतकरी व सहकारी संस्था पात्र ठरू शकतात. मात्र, योजना पूर्णपणे लागू होण्यापूर्वीच निवडणूक प्रक्रिया राबविल्यास जिल्ह्यातील




सुमारे ७० ते ८० टक्के संस्था मतदानाच्या प्रक्रियेपासून वंचित राहतील, जे सहकारातील लोकशाही तत्त्वांना बाधा देणारे असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. दरम्यान, प्रतिवादी क्रमांक १ व २ अर्थात राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण आणि जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्यावतीने अॅड. व्ही. एच. दिघे यांनी नोटीस स्वीकारली. न्यायालयाने सर्व प्रतिवादींना नोटिसा बजावत प्रकरणाची पुढील सुनावणी एका आठवड्यानंतर निश्चित केली आहे. या घडामोडीमुळे अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणूक प्रक्रियेबाबत उत्सुकता वाढली असून, न्यायालयाच्या पुढील निर्णयाकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# आर्थिक चणचण...

## लाडक्या बहिणींना साडी वाटप बंद

मुंबई (वृत्तसंस्था)

लाडकी बहीण योजनेबाबत महत्त्वाची अपडेट हाती आली आहे. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून ९२ लाख महिलांची नावे वगळण्यात आली होती. सरकारने घेतलेल्या या निर्णयाची चर्चा असताना आर्थिक चणचणीमुळे आणखी एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. फडणवीस सरकारच्या निर्णयाने लाडक्या बहिणींना मोठा दणका बसला आहे.एकनाथ शिंदे यांची योजना आर्थिक चणचणीमुळे ठप्प झाल्याचे सांगण्यात येत आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २०२३ मध्ये विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना दरवर्षी एक साडी मोफत देण्याची महत्त्वाकांक्षी 'कॅप्टिव्ह मार्केट योजना' सुरू करण्यात आली होती. मात्र, ही योजना आर्थिक चणचणीमुळे बंद करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. वस्त्रोद्योग विभागाने याबाबतचा शासन निर्णय गुरुवारी काढल्याची माहिती हाती आली आहे.

माजी मुख्यमंत्री शिंदे यांच्या काळात राज्याचे एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत जून २०२३ मध्ये या मोफत साडी योजनेची घोषणा करण्यात आली होती. राज्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना वस्त्रोद्योग विभागामार्फत यंत्रमागावर विणलेली एक साडी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी भेट म्हणून दिली जात होती.राज्यात २५ लाख अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना ही साडी दिवाळीत वितरीत करण्यात येत होती. या योजनेसाठी जवळपास वार्षिक १०० कोटींची तरतूद करण्यात आली होती. या योजनेच्या माध्यमातून २०२३, २०२४, २०२५ अशी सलग तीन वर्षे साड्यांचे वितरण करण्यात आले होते. यंदा ही योजना बंद करण्यात आली आहे. त्यामुळे यावर्षी साडीचे वितरण केले जाणार नाही, अशी माहिती वस्त्रोद्योग विभागातील अधिकाऱ्यांनी दिली आहे. योजनेचा आर्थिक भार लक्षात घेऊन योजना बंद करण्यात आल्याचेही सांगण्यात आलं आहे.

# प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

## गुणवत्ता, शिस्त व कौशल्य विकासावर भर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजापूर - नूतन आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, राजापूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. नवागत विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनाची दिशा, विविध शैक्षणिक संधी आणि अभ्यासक्रमाची माहिती देत त्यांचे मन:पूर्वक स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब वर्पे उपस्थित होते. यावेळी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, आयक्यूएसी समन्वयक तसेच मोठ्या संख्येने प्रथम वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. शीतल एस. एन. आणि प्रा. सोनाली देशमुख यांनी प्रभावी सूत्रसंचालन करत कार्यक्रमाची सुरुवात केली. प्रारंभी विद्यार्थ्यांचे स्वागत करून महाविद्यालयाच्या समृद्ध शैक्षणिक परंपरेची, गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेची आणि विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमात प्रा. हारदे सी. जी. यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी-२०२०) अंतर्गत विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या नव्या संधी, बहुविषयक शिक्षणाची संकल्पना आणि कौशल्याधिष्ठित शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यानंतर श्री. गोफणे आर. एल. यांनी महाविद्यालयाची सर्वांगीण माहिती दिली. विज्ञान विभागाची ओळख प्रा. साबळे ए. डी. यांनी, तर वाणिज्य विभागाची माहिती प्रा. गुंजाळ आर. एस. यांनी विद्यार्थ्यांना करून दिली.

राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सामाजिक बांधिलकी, व्यक्तिमत्त्व विकास आणि स्वयंसेवेच्या संधींबाबत प्रा. ओंकार थोरात यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थी विकास मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती प्रा. आहेर पी. बी. यांनी दिली. शासकीय शिष्यवृत्ती योजनांचा लाभ कसा घ्यावा, याविषयी प्रा. महेंद्र वैराळ यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. क्रीडा विभागातील सुविधा, स्पर्धा आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध संधींची माहिती प्रा. गुंजाळ पी. डी. यांनी दिली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, गुणवत्ता, संशोधनाची आवड, कौशल्य विकास आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उपलब्ध विविध संधींचा पुरेपूर लाभ घेण्याचे आवाहन केले. महाविद्यालयातील शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडविण्याचा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. खरात ए. एन. यांनी उपस्थितांचे आभार मानले. नव्या उत्साह, प्रेरणा आणि सकारात्मक वातावरणात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभाची सांगता झाली.

# सर्वत्र चांगला पाऊस पडून शेतकरी सुखी होऊ दे

## जगन्नाथ पुरीत माजी मंत्री थोरात यांची प्रार्थना

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी सततच्या विकास कामांमधून संगमनेर तालुका हा विकासाचे मॉडेल बनवला आहे .याचबरोबर प्रत्येक गावात विविध मंदिरे व सभामंडप निर्माण केले आहे. किंबहुना राज्यामध्ये सर्वाधिक चांगली मंदिरे आणि सर्वाधिक सप्ताह करणारा तालुका म्हणून संगमनेर ची ओळख निर्माण केली असून नुकतीच त्यांनी ओडिसा येथील जगन्नाथ पुरी येथे भेट असून राज्यात चांगला पाऊस पडावा याकरता जगन्नाथ चरणी प्रार्थना केली आहे.

ओडिसा येथील जगप्रसिद्ध श्रीक्षेत्र पुरी मधील जगन्नाथ रथयात्रा ही भारतातील भाविकांची आढळत श्रद्धा असलेली मोठी रथयात्रा आहे. शतकानूशतके चालत आलेली ही पवित्र परंपरा भारताच्या समृद्ध व सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडवत असते. समाजातील सर्व मानव जातीला समता सेवा प्रेम भक्तीचा संदेश देणारी ही यात्रा असून या यात्रेला महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी भेट देऊन दर्शन घेतले.

याप्रसंगी जगन्नाथ पुरी देवस्थान ट्रस्टच्या वतीने महाराष्ट्राचे माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी



ओरिसा राज्यातील काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष वरिष्ठ नेते आणि शासकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी कृषी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, संपूर्ण देशामध्ये यावर्षी अलनिनोचा प्रभाव जाणवतो आहे. यामुळे काही भागांमध्ये पाऊस झाला नाही. तर महाराष्ट्रामध्ये सह्याद्री खोरे वगळता इतर भागांमध्ये अजूनही पाऊस नाही. विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र या ठिकाणी सुद्धा काही ठिकाणी पेरण्या झालेल्या नाहीत. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहे. ओडिसा राज्यातही पाऊस कमी झालेला आहे. देशातील शेतकरी हा जगाचा पोशिंदा असून पाऊस चांगला झाला तर तो सुखी समाधानी असतो. चांगल्या पावसामुळे सर्व राज्यांमधील नागरिक आनंदी व सुखी समाधानी होतात. पशुपक्षी प्राणी आनंदी होतात. म्हणून देशभरात चांगल्या पावसाची गरज आहे.

संपूर्ण देशावर आलेले अलनिनोचे संकट जगन्नाथ पुरी महाराजांच्या कृपेने दूर होऊन महाराष्ट्र, ओरिसा सह सर्व राज्यांमध्ये चांगला पाऊस पडावा व शेतकरी सुखी समाधानी व्हावा अशी प्रार्थना त्यांनी यावेळी जगन्नाथ महाराजांच्या चरणी केली. याचबरोबर मानवता हा धर्म महत्त्वाचा असून जात-पात भेदभाव न मानता सर्व माणूस समान आहे. समता, सेवा, प्रेम आणि भक्तीचा संदेश देणारे हे भक्तिमय वातावरण असल्याचे ते म्हणाले.

# श्रद्धा, विश्वास आणि नामस्मरणातून विठ्ठल दर्शन

संसार सरळ, सोपा आणि सुंदर आहे. त्याला घाबरण्याचे कोणतेही कारण नाही. श्रीभगवंत स्वतः आश्वासन देतात की, जो माझा होतो, त्याच्यासाठी हा भवसागर पार करणे अत्यंत सोपे होते. हा भवसागर आपल्याला बुडविण्यासाठी नसून जीवनाचा आनंद अनुभवण्यासाठी आहे. जणू पांडुरंग भक्ताला सांगतो, माझ्या मागे ये, घाबरू नकोस; या भवसागरात कमरेएवढेच पाणी आहे. मात्र यासाठी भगवंतावर दृढ विश्वास असणे आवश्यक आहे.



भगवंताने आपल्याला अमूल्य मनुष्यदेह दिला आहे. त्यामुळे संसारात संतोषाने आणि समाधानाने जगायला शिकले पाहिजे. संसाररूपी सागर हा पांडुरंगानेच निर्माण केला आहे. त्यामुळे त्यात गोड फळे मिळाली तर आनंदाने स्वीकारावीत आणि कडू फळे मिळाली तरी तक्रार करू नये. जीवनातील प्रत्येक अनुभव हा त्याचाच प्रसाद आहे.

पालखी सोहळ्याकडे पाहिले तर लाखो वारकरी अनेक अडचणींना सामोरे जातात; तरीही त्यांच्या ओठांवर तक्रार नसते, तर फक्त विठ्ठल... विठ्ठल... हा अखंड नामगजर असतो. हाच खरा भक्तीचा मार्ग आहे.

**संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात-**
**विटेवरी उभा, कटेवरी हात।**
**काय मौजेचा पंढरीनाथ।।**

विटेवर उभा असलेला, कमरेवर हात ठेवलेला विठ्ठल हा सर्वसामान्यांचा देव आहे. तो आपल्याला दिसतो का? नक्कीच दिसतो; मात्र त्यासाठी अंतःकरणाची निर्मळ दृष्टी आवश्यक आहे. विठ्ठलाचे दर्शन म्हणजे केवळ मूर्ती पाहणे नव्हे, तर त्याच्याशी एकरूप होणे होय.

वारकरी शेकडो किलोमीटर पायी चालत पंढरीला येतात. त्यांना विठ्ठलाचे दर्शन होते, कारण त्यांनी त्याचा शोध घेतलेला असतो. शोधणाऱ्यालाच परमात्मा सापडतो.

यासंदर्भातील एक सुंदर दृष्टांत सांगितला जातो. एक लहान मासोळी राणी मासोळीला विचारते, सागराविषयी खूप ऐकले आहे. तो नेमका कुठे आहे? त्याला कसे शोधायचे? कोणता मार्ग, कोणता गुरु, कोणता उपाय करावा लागेल? राणी मासोळी हसून म्हणते, तू सागर शोधायला निघालीस तर भटकत राहशील. कारण तू स्वतः सागरात जन्मली आहेस, सागरातच वाढली आहेस, सागरातच जगतेस आणि सागरातच विलीन होणार आहेस. तू सागरापासून वेगळी नाहीस.

परमेश्वर आणि भक्त यांचे नातेही असेच आहे. आपण परमेश्वरापासून वेगळे नाही. फक्त त्याची अनुभूती होण्यासाठी अंतःकरण शुद्ध आणि भक्ती एकाग्र असणे गरजेचे आहे.

महायोगपीठ पंढरपुरात लाखो वारकरी विठू माऊलीचा गजर करतात. ते विठ्ठल कुठे आहे, असा प्रश्न विचारत नाहीत. कारण त्यांच्या भजनात, नामस्मरणात आणि भक्तीत त्यांना प्रत्येक ठिकाणी विठ्ठलाचे दर्शन होत असते. मूर्तीतील विठ्ठल त्यांना सजीव अनुभवास येतो. यामागे असते त्यांची तल्लीन, निष्काम आणि एकनिष्ठ भक्ती.

आपली दृष्टी निर्मळ, मन पवित्र आणि वाणी सात्त्विक असेल, तर आपल्यालाही विठ्ठलाचे दर्शन घडू शकते. विठू माऊली आपल्या भक्तांचे पालन करणारी, त्यांना उन्नत करणारी आणि स्वतः लहान होणारी आहे.

भक्त पुंडलिकाने थोडा वेळ उभे रहा असे सांगितले, तेव्हा विश्वाचे पालन करणारा परमेश्वर विटेवर उभा राहिला. हे त्याच्या भक्तवत्सल स्वभावाचे सर्वोच्च उदाहरण आहे. प्रेमापुढे परमेश्वरही नम्र होतो. तो भक्ताला मोठेपण देतो आणि स्वतः लहान होतो. हीच पांडुरंगाची अद्वितीय महती आहे.

म्हणूनच विठू माऊली आश्वासक आहे. ती भक्ताला कधीही भवसागरात बुडू देत नाही. तिच्या कृपेने संसाररूपी सागर सहज पार करता येतो आणि परमार्थाचा मार्गही सुलभ होतो. श्रद्धा, विश्वास, संतोष आणि अखंड नामस्मरण यांच्या आधारे आपणही या आश्वासक विठू माऊलीच्या चरणी पोहोचू शकतो. तेव्हाच तिच्या दिव्य दर्शनाचा आणि कृपेचा खरा अनुभव

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी सक्रिय सहभागी व्हावे - इंद्रजित देशमुख



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर तसेच संगमनेर तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या 'पालक-शिक्षक मेळाव्या'ला पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मातोश्री मंगल कार्यालय येथे आयोजित या मेळाव्यात प्रख्यात व्याख्याते इंद्रजित दत्ताजीराव देशमुख यांनी पालक, विद्यार्थी आणि शिक्षकांना जीवनमूल्ये, शिक्षण, संस्कार व व्यक्तिमत्त्व विकास या विषयांवर प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

मेळाव्याच्या प्रारंभी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालकांची भूमिका, अभ्यासाचे प्रभावी तंत्र, एकाग्रता वाढविणे, कुटुंब व समाजातील उत्तम वर्तणूक तसेच आरोग्यदायी जीवनशैली या विषयांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. मोबाईलचा वाढता वापर, व्यसनाधीनता आणि बदलती सामाजिक परिस्थिती यामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांचा उल्लेख करत मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पालकांनी सजग राहण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

आपल्या प्रभावी व्याख्यानात इंद्रजित देशमुख म्हणाले की, आजूबाजूचे जग वाईटांचे आहे असे म्हणण्यापेक्षा त्या जगात चांगुलपणा शोधण्याची आणि स्वतः चांगुलपणा निर्माण करण्याची गरज आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या अवघाची संसार सुखाचा करीन, आनंदे भरीन तिन्ही लोक या विचाराचा संदर्भ देत त्यांनी स्वार्थी वृत्तीपासून समाजहिताच्या विचारांकडे वाटचाल करण्याचे आवाहन केले. एकट्याचा संसार सुखाचा या मानसिकतेतून अवघा संसार सुखाचा या विचाराकडे समाजाने प्रवास केला पाहिजे असे त्यांनी सांगितले. यशासाठी सातत्यपूर्ण परिश्रम आणि समर्पण आवश्यक असल्याचे सांगताना त्यांनी ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांचे उदाहरण दिले. लेजंड म्हणजे काळाच्या पडद्यावर कायमस्वरूपी नाव कोरणारी व्यक्ती, असे सांगत त्यांनी प्रत्येकाने आपल्या कार्यातून वेगळी ओळख निर्माण करण्याचे आवाहन केले. साने गुरुजींच्या जीवनातील प्रसंग सांगताना त्यांनी बाळा, तू कोणही हो; पण सगळ्यांचा आवडता हो हा संदेश पालक व विद्यार्थ्यांसमोर मांडला. आयुष्यात सर्वांचा प्रिय होणे हीच खरी बुद्धिमत्ता असल्याचे सांगत त्यांनी अवकाशीय बुद्धिमत्ता आणि व्यक्तिमत्त्व विकासातील तिचे महत्त्वही स्पष्ट केले.

जीवनातील खरे सुख हे सकारात्मक दृष्टिकोन, समाधान, संस्कार आणि ज्ञानार्जनातून मिळते, असे प्रतिपादन करत त्यांनी विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न करावेत, तर पालकांनी मुलांना योग्य दिशा, वेळ आणि प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांना उपस्थित पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या मेळाव्यास आबासाहेब थोरात, सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक संस्थे संचालक लक्ष्मणराव कुटे, प्रा. बाबा खरात, सिताराम पाटील वर्पे, प्राचार्य एस.एम. खेमनर, उपप्राचार्य, उपमुख्याध्यापिका, परिवेक्षक, संगमनेर तालुक्यातील विविध शैक्षणिक संस्थांचे शिक्षक, पालक, विद्यार्थी, शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा मार्गदर्शनपर कार्यक्रमांची आवश्यकता व्यक्त केली.

# रेशन धान्य वेळेत पोहोचविण्याची ग्राहक पंचायतची प्रशासनाकडे मागणी



युवावार्ता(प्रतिनिधी)

अकोले - अकोले आदिवासी तालुक्यामध्ये मे-जून महिन्याचे रेशनिंगचे धान्य वाहतुकीच्या नावाखाली उशिरा पोहचले व जुलै महिन्याचे ही उशिरा पोहचत आसल्याबाबत यामुळे सर्वसामान्य नागरिक 'ग्राहक' धान्या पासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्या बाबतचे निवेदन अकोले तालुक्याचे नायब निवासी तहसिलदार किसन लोहरे यांना दिल्याची माहिती ग्राहक पंचायतचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छींद्र मंडलीक, सचिव राम रुद्रे, माधवराव तिटमे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की अकोले आदिवासी तालुक्यामध्ये रेशनिंगचे धान्य मे, जून, महिन्यामधील धान्य वाहतुकीच्या नावा खाली उशिरा बऱ्याच भागामध्ये पोहचले आणि आता ही जूलै महिन्याचे धान्य अद्याप पर्यंत बऱ्याच भागामध्ये आजून पोहचले नाही.

बीपीएल, अंत्योदय, अन्नपुर्णा, प्राधान्यक्रम हे सामान्य ग्राहक, नागरिक रेशनिंग धान्यापासून वंचित राहू नये.आदिवासी भागातील सर्वात लांबच्या व पाऊस,अतीवृष्टी मधिल गावात सर्वात पहिले रेशनिंगचे धान्य पोहच झाले पाहिजे. बीपीएल, अंत्योदय,अन्नपूर्णा, प्राधान्यक्रम रेशनिंग धान्य वाहतुकीचे साधने गाड्या या मध्ये वाढ करण्यात यावी. रेशनिंग धान्य वाहतूक एजन्सी, ठेकेदार व त्यांच्या मार्फत रेशनिंग धान्य वाहतूक नेमलेले ठेकेदार हे शासनाने ठरऊन दिलेल्या नियमाचे, नियमावलीचे पालन करीत नसल्यास त्यांना नोटीस पत्र व्यवहार अन्यथा काळ्या यादीत टाकावे.वरील सर्व बाबींकडे लक्ष घालून सर्व सामान्य ग्राहक रेशनिंग धान्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता, दखल घ्यावी असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छींद्र मंडलीक, सचिव राम रुद्रे, माधवराव तिटमे रामदास पांडे, रजनीकांत भांगरे, ज्ञानेश्वर पुंडे, अर्जुन वैद्य, अनंत घाणे, रामदास पवार, अशोक उघडे, गंगाराम धिंदळे तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर, राजेंद्र घायवट, भाऊसाहेब वाकचौरे प्रा. डॉ. सुनिल शिंदे, जालिंदर बोडके, गंगाराम धिंदळे, शांताराम दराडे,मोहन मुंढे, दत्ता ताजणे, सुदाम मंडलिक यांच्यासह अनेकांची नावे आहे.

# विद्यार्थ्यांना मिळणार नशाविरोधी शिक्षण

मुंबई (वृत्तसंस्था)

शालेय जीवनापासूनच अंमली पदार्थांच्या घातक दुष्परिणामाविषयी विद्यार्थ्यांमध्ये व्यापक जागृती आणण्यासाठी इयत्ता सातवी ते दहावीच्या अभ्यासक्रमामध्ये अंमली पदार्थ दुष्परिणाम विषयक घटकांचा समावेश करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी दिले. सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित 'अंमली पदार्थमुक्त महाराष्ट्र व्यूहरचना आणि कृती योजना' बैठकीत ते बोलत होते.

सशक्त महाराष्ट्रासाठी व्यसनमुक्तीच्या या चळवळीत सर्वांचे योगदान आवश्यक असल्याचे सांगत, नैसर्गिक व कृत्रिमरित्या तयार होणाऱ्या अंमली पदार्थांचे उत्पादन, पुरवठा आणि खरेदी-विक्रीच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेला मुळापासून उखडून टाकण्याचे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले. म नशेच्या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याची इच्छा असलेल्या नागरिकांसाठी राज्यामध्ये नशामुक्ती केंद्रांची एक मजबूत साखळी उभारण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

# वांबोरी चारीसाठी १४ कोटी व बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी ६ कोटींचा निधी : ना. विखे पाटील



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन वांबोरी चारीच्या दोन्ही टप्प्यांतील कामांसाठी १४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या केटीवेअर व बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी ६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत टंचाई निवारणासाठी आवश्यक सर्व उपाययोजना तातडीने राबविण्यात येतील, अशी ग्वाही जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील टंचाई आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला आमदार मोनिका राजळे, नगराध्यक्ष अभय आव्हाड, प्रांताधिकारी प्रसाद मते, सभापती सुभाष बर्डे, राहुल राजळे तसेच विविध विभागांचे अधिकारी, ग्रामस्थ आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील टंचाई परिस्थितीचा सविस्तर आढावा घेत संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधींशी चर्चा केली. टंचाईच्या काळात सर्व विभागांनी समन्वयाने काम करून नागरिकांच्या अडचणींना प्राधान्याने प्रतिसाद द्यावा, असे त्यांनी सांगितले. शेवगाव शहरात सध्या १७ ते १८ दिवसांनंतर पाणीपुरवठा होत असून, ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. पाथर्डी शहरातही पाणीपुरवठ्याच्या समस्या असून, त्या दूर करण्यासाठी नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन प्रभावी नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्थानिक राजकारणापासून अलिप्त राहून जनतेच्या हिताला प्राधान्य द्यावे. तसेच टंचाईच्या काळात मुख्यालय न सोडता कार्यक्षेत्रात राहून नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवाव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शासनाच्या योजना व निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अधिकारी व कर्मचाऱ्यांची असून, त्यांनी शासनाचे प्रतिनिधी म्हणून नागरिकांशी संवेदनशीलतेने व सकारात्मक संवाद साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प असल्याने परिस्थिती गंभीर असून, धरणांतील उपलब्ध पाणीसाठ्याचे सप्टेंबरपर्यंत नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्यात येत आहे. पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य देऊन संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी राज्य शासन आवश्यक उपाययोजना करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जलसंपदा विभागामार्फत वांबोरी चारीच्या दोन्ही टप्प्यांतील कामांना प्राधान्य देण्यात आले असून, त्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कामांसाठी सुमारे १४ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

# संतांचे संगती... आत्मज्ञानाची प्रगती

## वारकरी संप्रदायातील थोर संत कवयित्री : संत सोयराबाई



संत सोयराबाई या १४ व्या शतकातील महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाच्या एक महान संत कवयित्री होत्या. त्या संत चोखामेळा यांच्या पत्नी होत्या. महार जातीत जन्मल्यामुळे त्यांना समाजाच्या तळागाळातील वेदना जवळून अनुभवायला मिळाल्या. पण त्याच वेदनांतून त्यांनी समता, भक्ती आणि आत्मसन्मानाचा संदेश जगाला दिला. त्यांच्या अभंगात प्रपंच आणि परमार्थ यांचा सुरेख संगम दिसतो.

**जन्म आणि कौटुंबिक पार्श्वभूमी**

सोयराबाईंचा जन्म १३ व्या शतकाच्या शेवटी आणि १४ व्या शतकाच्या सुरुवातीला मंगळवेढ्याच्या महारवाड्यात झाला असावा असे मानले जाते. त्या चोखामेळांच्या पत्नी, निर्मळा यांच्या नणंद आणि बंका महार यांच्या बहीण होत्या. हे संपूर्ण कुटुंबच जातीव्यवस्थेला प्रश्न विचारणारे आणि भागवत धर्माला वाहून घेतलेले होते.

महार समाजाला गावकुसाबाहेर राहावे लागे. मेलेली जनावरे उचलणे यासारखी गावातील सर्व घाणेरडी कामे त्यांच्यावर सोपवली जात. त्यामुळे त्यांना अस्पृश्य मानले जाई. शिक्षण, मंदिरप्रवेश आणि सामाजिक सुविधांनाही त्यांना मुकावे लागे.

**भक्तीचा मार्ग आणि पंढरीची वारी**

चोखोबांसोबत सोयराबाई दरवर्षी पंढरपूरला वारी करायच्या. विठ्ठल आणि वारकरी यांच्यातील सर्वसमावेशक प्रेम पाहून त्यांच्या जीवनाला नवी दिशा मिळाली. त्यांचे गुरू म्हणजे त्यांचे पती चोखामेळा आणि संत नामदेव.

वारीच्या वाटेवर आणि पंढरीतही त्यांना ब्राह्मणांकडून छळ सोसावा लागला. तरीही त्यांनी श्रद्धा आणि मन:शांती कधीच सोडली नाही.

एकदा चोखोबांच्या घरी संत-महंतांची पंगत होती. स्वर्गातून इंद्रदेवाने अमृतकलश आणला. त्याचे शुद्धीकरण चोखोबा आणि सोयराबाई यांच्याच हातून करून घेतले गेले. चोख्याच्या अंगणी बैसल्या पंगती, स्त्री ते वाढिती चोखियाची. या प्रसंगातून त्यांचे संतत्व स्वयंभू असल्याचे दिसून येते.

**साहित्य आणि अभंगवाणी**

सोयराबाईंनी स्वत:च्या शैलीतील मुक्तछंदात मोठे साहित्य निर्माण केले. आज सुमारे ६२ अभंग उपलब्ध आहेत. त्यांचे अभंग हे केवळ भक्ती नव्हे, तर सामाजिक क्रांतीचा दस्तऐवज आहेत.

**त्यांच्या अभंगांचे ३ मुख्य सूर:**

१. देवावरील हक्काची भक्ती: त्या देवाला जाब विचारतात. तू दलितांना का विसरलास अशी तक्रारही करतात. देवाला त्या साधा दहीभात, भाकरीचा तुकडा अर्पण करतात. त्यातच त्यांची निर्मळ भक्ती दिसते.

२. अस्पृश्यतेला विरोध: त्यांचा सर्वात मोठा विचार म्हणजे शरीर आणि आत्मा यातील भेद. त्या म्हणतात:

**देहासी विटाळ म्हणती सकळ,**
**आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध**

शरीर जन्मताच अशुद्ध आहे, मग कोणी शुद्ध कसा? शरीराचा विटाळ शरीरापुरता. आत्मा मात्र त्याला कधीच शिवत नाही. जातीच्या आधारावर माणसाला तुच्छ लेखणे त्यांना मान्य नव्हते.

३. प्रपंचातील परमार्थ: मीरा सारखी त्या वैराग्याचा उपदेश करत नाहीत. उलट संसार सांभाळूनच देवाला कसे गवसावे हे सांगतात. अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग हा त्यांचा प्रसिद्ध अभंग आहे.

**कर्ममेळाचा जन्म आणि चमत्कार**


सोयराबाईंना मूलबाळ नव्हते याची खंत होती. एकदा त्या गर्भवती असताना चोखोबा बाहेर गेले होते. बाळंतपणाची वेळ आली तेव्हा विठ्ठलाने स्वत: निर्मळाचे रूप घेऊन त्यांचे बाळंतपण केले आणि मुलाचे नाव कर्ममेळा ठेवले. हेच पुढे संत कर्ममेळा म्हणून प्रसिद्ध झाले.

**वारसा आणि महत्त्व**

सोयराबाई या केवळ चोखोबांची पत्नी नव्हत्या. त्या एक स्वतंत्र विचारवंत, कवयित्री आणि समाजसुधारक होत्या. त्यांनी एका शूद्र स्त्रीने ज्ञानाची आस धरून, समाजाशी झगडून, देवाशी वाद घालून भागवत धर्मात अढळ स्थान मिळवले.

त्यांच्या अभंगातून सामान्य संसारी स्त्री कशी प्रपंच आणि परमार्थ दोन्ही सांभाळून आत्महित साधते हे कळते. वारकरी संप्रदायाच्या समतेच्या पताकेला त्यांनी आपल्या शब्दांनी बळ दिले.

आजही वारीत त्यांचे अभंग गायले जातात आणि पददलित समाजाला ते प्रेरणा देतात.



**संकलन, संतचरणरज...**
**श्री. सदाशिव रामनाथ मुळे**
(पुणे युवावार्ता, प्रतिनिधी), मो . ८६६८३२७१७४
सौजन्य - निजध्यास...

# दीपिका वाळुंज यांना पीएच. डी. प्रदान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे परिसरातील गोड्या पाण्यात आढळणाऱ्या प्लॅनेरियन्सच्या वर्गीकरण व रिजनरेशन या अभ्यासावर संशोधन करून रहिमपूरच्या संशोधिका दीपिका एकनाथ वाळुंज यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे आपला पी एच.डी. प्रबंध यशस्वीरीत्या सादर केला. त्यांच्या या उल्लेखनीय संशोधनाचे परीक्षण करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने त्यांना शिक्षण क्षेत्रातील मानाची डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.) पदवी नुकतीच बहाल केली आहे.

पुणे परिसरातील गोड्या पाण्यातील प्लॅनेरियन्सच्या वर्गीकरणविषयक अभ्यास या विषयावरील हे संशोधन प्रा. डॉ. रवींद्र क्षीरसागर, मॉडर्न कॉलेज, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. तसेच प्राचार्य डॉ. संजय खरात, प्रा. शकेरा इनामदार यांचेही मार्गदर्शन लाभले. त्यांचे हे संशोधन औषध निर्मिती, नुकसान झालेल्या पेशिंची नवनिर्मिती, शरीरातील अवयवांची नवं निर्मिती साठीच्या संशोधणासाठी मार्गदर्शक तत्व देणारे ठरणार आहे. भारतामध्ये या विषयावर संशोधन करणाऱ्या मोजक्या संशोधकांपैकी दीपिका वाळुंज ह्या एक ठरल्या आहेत.

संशोधन कार्य यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी दीपिका वाळुंज यांना त्यांचे वडील एकनाथ वाळुंज तसेच आई मंगल वाळुंज,भाऊ दिपक वाळुंज आणि प्रा. डॉ. लक्ष्मण घायवट यांचे मोलाचे सहकार्य व प्रोत्साहन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# भारताची हायड्रोजन ट्रेन धावली

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी देशातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनला हिरवा झेंडा दाखवून रवाना केले. ही ट्रेन जींद ते सोनीपत दरम्यान धावली. यासोबतच, हायड्रोजन इंधनावर चालणारी ट्रेन सुरू करणारा भारत जगातील पाचवा देश बनला आहे. यापूर्वी जर्मनी, फ्रान्स, स्वीडन आणि चीनमध्येच हायड्रोजन ट्रेन्स धावत आहेत. १० डब्यांची ही ट्रेन जींद-सोनीपत मार्गावर १४ स्थानकांदरम्यान जास्तीत जास्त ७५ किमी प्रति तास वेगाने धावेल. याचे भाडे ५ ते २५ रुपयांच्या दरम्यान ठेवण्यात आले आहे. ट्रेन ८९ किलोमीटरचा प्रवास सुमारे २ तासांत पूर्ण करेल.

# संपादकीय...

## पावसाचा प्रत्येक थेंब वाचवणे काळाची गरज

भारतीय हवामान खात्याने यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याचा अंदाज वर्तवला होता. तसेच मान्सूनचे आगमन उशिरा होईल, असेही सांगण्यात आले होते आणि हा अंदाज मोठ्या प्रमाणात खरा ठरला आहे. मान्सून वेळेत दाखल झाला असला तरी त्याचा वेग मंदावल्यामुळे जून महिना जवळपास कोरडाच गेला. त्यामुळे शेतकरी, व्यापारी, उद्योग क्षेत्र तसेच सर्वसामान्य नागरिकांची चिंता वाढली होती. खरीप हंगामाच्या पेरण्या रखडल्या, शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसले आणि राज्यात पावसाअभावी अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले. जून महिन्याप्रमाणे जुलै महिनाही कोरडा जाऊ नये, अशी प्रार्थना शेतकऱ्यांसह सर्व नागरिकांनी वरुणराजाकडे केली होती. या प्रार्थनेला प्रतिसाद देत जुलै महिन्याच्या सुरुवातीपासून राज्यात पावसाने दमदार पुनरागमन केले. विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच मराठवाड्यातील अनेक भागांत जोरदार पाऊस झाला. पावसामुळे धरणांतील पाणीसाठ्यात वाढ झाली, नद्या-नाले वाहू लागले, तलाव भरू लागले आणि ओढ्यांनाही जीवदान मिळाले. धरणीमाताही चिंब भिजून हिरवाईचा शालू परिधान करू लागली आणि सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, जुलैच्या पहिल्या आठवड्यानंतर पुन्हा पावसाने विश्रांती घेतल्याचे चित्र दिसून येत आहे. राज्यावर अल निनोचा प्रभाव कायम असल्याने पुढील काळात पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व अधिक वाढले आहे. आज पडणारे पाणी जर योग्य प्रकारे साठवले आणि जिरवले नाही, तर भविष्यात पुन्हा पाणीटंचाई आणि दुष्काळाच्या संकटाला सामोरे जावे लागू शकते. गेल्या काही वर्षांमध्ये राज्यातील अनेक भागांनी दुष्काळाचे चटके सोसले आहेत. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. अनेक गावांमध्ये नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक किलोमीटरची पायपीट करावी लागली. टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ आली. जनावरांसाठी पाणी उपलब्ध नव्हते, तर शेती पाण्याअभावी करपून गेली होती. अशा परिस्थितीत पाण्याचे महत्त्व अधिक प्रकर्षाने जाणवते. यावर्षीही पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता असल्याने पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घेणे अत्यावश्यक आहे. पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन आणि शास्त्रीय व्यवस्थापन ही काळाची गरज बनली आहे. आज पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब भविष्यातील जलसुरक्षेची हमी ठरू शकतो. त्यामुळे पाणी साठवणे आणि पाणी जिरवणे या दोन्ही गोष्टींवर समान भर देणे आवश्यक आहे. आपल्या देशात आणि विशेषतः महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो; मात्र त्यातील मोठा हिस्सा वाहून जाऊन समुद्राला मिळतो. जमिनीवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन नसल्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होतो. कमी पाऊस पडणाऱ्या भागांसाठी तर हा अपव्यय अधिक गंभीर ठरतो. त्यामुळे पाणी अडवा, पाणी जिरवा ही संकल्पना केवळ घोषणा न राहता ती लोकचळवळ बनली पाहिजे. पाणी साठवण्यापेक्षा पाणी जिरवण्याचा फायदा अधिक आहे. जमिनीत मुरलेले पाणी भूगर्भातील जलसाठा वाढवते आणि त्याचे बाष्पीभवन होत नाही. परिणामी विहिरी, कूपनलिका आणि इतर जलस्रोतांना दीर्घकालीन आधार मिळतो. भूजल पातळी वाढल्यामुळे शेती, पिण्याचे पाणी आणि उद्योगांसाठीही दीर्घकाळ पाणी उपलब्ध राहते. त्यामुळे जलसंधारणाच्या उपाययोजनांमध्ये पाणी जिरवण्याच्या तंत्रांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. जलव्यवस्थापनाचा अर्थ केवळ धरणे बांधणे, कालवे काढणे किंवा पाईपलाईनद्वारे शहरांपर्यंत पाणी पोहोचवणे एवढाच मर्यादित नाही. जलव्यवस्थापनाचा खरा अर्थ म्हणजे समाज आणि पाणी यांच्यातील नाते दृढ करणे होय. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व नागरिकांना पटवून देणे आणि पाणी वापराबाबत जबाबदारीची भावना निर्माण करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी व्यापक जनजागृतीची गरज आहे. शाळा आणि महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना जलसंवर्धन, जलसाक्षरता आणि पाणी व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले पाहिजे. लहान वयातच पाण्याचे महत्त्व समजल्यास भविष्यात जबाबदार नागरिक तयार होऊ शकतात. यासोबतच ग्रामसभा, सामाजिक संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनीही जलसंवर्धनाच्या मोहिमा राबवणे आवश्यक आहे. सरकारी स्तरावर नदी, तलाव, विहिरी, बंधारे आणि जलाशयांमध्ये जास्तीत जास्त पाणी साठवता येईल यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न होणे गरजेचे आहे. गावपातळीवर जलसंधारणाची कामे, गाळ काढणे, बंधारे उभारणे आणि जलस्रोतांचे पुनरुज्जीवन यास प्राधान्य दिले पाहिजे. जलयुक्त शिवारसारख्या उपक्रमांना अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. यासोबतच प्रत्येक घर, सोसायटी, शाळा, महाविद्यालय, उद्योग आणि सरकारी कार्यालयांमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग अर्थात पर्जन्य जलसंधारण व्यवस्था उभारली पाहिजे. छतावर पडणारे पावसाचे पाणी साठवून ते भूगर्भात मुरविणे किंवा विविध गरजांसाठी वापरणे शक्य आहे. शहरांमध्ये वाढत्या नागरीकरणामुळे जमिनीची पाणी शोषून घेण्याची क्षमता कमी होत असल्याने पर्जन्य जलसंधारण अधिक महत्त्वाचे बनले आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य आहे. कारण पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. भविष्यातील पिढ्यांना पाण्याची टंचाई भेडसू नये, शेती आणि उद्योगांना आवश्यक पाणी उपलब्ध राहावे आणि दुष्काळाचे संकट कमी व्हावे, असे वाटत असेल तर आजपासूनच जलसंवर्धनाच्या दिशेने ठोस पावले उचलावी लागतील.`.

## अमृतवाहीनीज निडो इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांची हिमालयात यशस्वी भरारी



युवावार्ता ( प्रतिनिधी )

युवावार्ता - अमृतवाहीनी निडो इंटरनॅशनल स्कूलचा विद्यार्थी राजवीर सौरभ कासार आणि त्याचा लहान भाऊ राजदीप सौरभ कासार यांनी हिमालयातील १३,८९५ फूट उंचीचे पातालसू शिखर यशस्वीपणे सर केले. अवघ्या ८ वर्षांच्या राजवीरने आणि ४ वर्षांच्या राजदीपने कमी वयात हा आव्हानात्मक ट्रेक पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधले, अशी माहिती अमृतवाहीनीज निडो इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या अंजली कन्नावार मॅडम यांनी दिली. या मोहिमेद्वारे दोन्ही भावांनी साहसासाठी वय नव्हे, तर जिद्द आणि उत्साह महत्त्वाचा असतो हे सिद्ध केले असे कुटुंबीयांनी सांगितले.

अशा साहसी उपक्रमांमुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, शिस्त, सहनशीलता आणि निसर्गप्रेम विकसित होते. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, सातत्य, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, विश्वस्त सौ.शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री .अनिल शिंदे, डायरेक्टर ऑफ अकॅडमिक्स डॉ. जे .बी . गुरव, निडो स्कूलच्या प्राचार्या अंजली कन्नावार, सर्व शिक्षक यांनी दोघा भावंडांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षक आणि पालकांकडून राजवीर व राजदीप यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.


**CHANGE IN NAME**

**I HAVE CHANGED MY OLD NAME**
MOHSIN HAROON SHAIKH

**NEW NAME AS**
MOHSIN HARUN BAGWAN

ADD - NEAR MASJID, BAGWANPURA, SANGAMNER TAL- SANGAMNER , DIST AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**

**I HAVE CHANGED MY OLD NAME**
NIYAZ AHMED ABDUL HASAN SHAIKH

**NEW NAME AS**
NIYAZ ABDUL HASAN SHAIKH

ADD - KURAN ROAD, APNA NAGAR , SANGAMNER TAL- SANGAMNER , DIST AHMEDNAGAR


## संगमनेर तालुक्यातील पारेगाव बुद्रुक येथे कविवर्य कुसुमाग्रज वाचनालयाचे उद्‌घाटन..



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारेगाव बुद्रुक येथे 'कविवर्य कुसुमाग्रज वाचनालय' सुरू होणे ही विद्यार्थ्यांच्या ज्ञानसमृद्ध भविष्यासाठी अत्यंत प्रेरणादायी घटना असल्याचे विचार केंद्रप्रमुख सुनील घुले यांनी व्यक्त केले.

मुंबई येथील सेवा सहयोग संस्थेने दिलेली ४६१ दर्जेदार पुस्तके आणि वाचनालयाचे कपाट हा केवळ वस्तूंचा नव्हे, तर ज्ञान, संस्कार आणि वाचन संस्कृतीचा अमूल्य ठेवा असल्याचे केंद्रप्रमुख घुले यांनी सांगितले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. साहेबराव गायकवाड यांनी सांगितले की मुलांची ज्ञानाची भूक भागवण्यासाठी सेवा सहयोग संस्था मुंबई यांची ही पुस्तकरुपी भेट प्रेरणादायी आहे. या उपक्रमासाठी शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभाग मिळत आहे. ही अत्यंत आनंदाची बाब आहे.

जिल्हा परिषदेने मागील वर्षी कुसुमाग्रज वाचनालयाची संकल्पना मांडली होती. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करून त्यांना विचारशील, सुसंस्कृत, सर्जनशील आणि सक्षम नागरिक घडविण्यास निश्चितच मोलाचे योगदान मिळेल अशी भावना प्रकल्प प्रमुख सुखदेव इल्हे यांनी व्यक्त केली. या उपक्रमासाठी पदवीधर शिक्षक नंदू कुडेकर,सुरेखा भालेराव, तसेच प्रभाकर काळे, अशोक झोडगे, बाळासाहेब पाबळे यांचे सहकार्य मिळत आहे. या उपक्रमाचे संगमनेर तालुका व जिल्हा परिषद अहिल्यानगरचे शिक्षण विभाग, पारेगाव बुद्रुक शाळेतील व्यवस्थापन समिती, पालक यांच्याकडून कौतुक होत आहे.


**पाहिजेत**
नामांकित व्हॅल्युएशन फर्ममध्ये पुरूष पाहिजेत
पुरुष- 02 जागा
इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा
9860565356

**पाहिजेत**
घरकामासाठी होतकरू महिला कामगार पाहिजे
वेळ ३ ते ७ मालदाड रोड
डॉ. शेवाळे हॉस्पिटल, विद्यानगर, संगमनेर
9822304638

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग - १ जागा
दुकानकामासाठी - ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
- संपर्क -
8788945208
8208223721


## शिंदेवाडी शाळेत देणगी, वृक्षारोपण आणि वृक्ष पालकत्वाचा आदर्श उपक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर अध्यात्मिक श्रद्धेपोटी आपण ज्याप्रमाणे पवित्र मंदिरांना दान देतो, त्याच धर्तीवर उद्याचा सुजाण भारतीय नागरिक घडवणाऱ्या जीवन शिक्षण मंदिरांना म्हणजेच शाळांनाही सढळ हस्ते दान दिले पाहिजे. जर ही ज्ञानमंदिरे भक्कमपणे उभी राहिली, तरच आपला देश खऱ्या अर्थाने सामर्थ्यसंपन्न बनेल, असे प्रतिपादन संगमनेर येथील प्रसिद्ध अंबिका मुळव्याध व भगंदर क्लिनिकचे संचालक डॉ. दत्तात्रय आहेर यांनी केले.

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेवाडी (गणोरे) येथे आयोजित वृक्षारोपण व देणगी प्रदान समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विस्तार अधिकारी अनिल गायकवाड होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संगमनेर रोटरी क्लबचे संचालक सुनील कडलग, डॉ. रेखा आहेर, सरपंच संतोष आंबरे, मारुती आहेर, अशोक आहेर, राजेंद्र आंबरे, दिगंबर दातीर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षण विस्तार अधिकारी अनिल गायकवाड यांच्या हस्ते डॉ. दत्तात्रय आहेर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

आपल्या उत्पन्नातील काही वाटा समाजासाठी खर्च करून सामाजिक भान जपणे आणि माजी विद्यार्थी म्हणून शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले कर्तव्य आहे, याच भावनेतून डॉ. दत्तात्रय आहेर यांनी शिंदेवाडी शाळेच्या विकासकामांसाठी ५१ हजार रुपयांची भरीव देणगी जाहीर केली व सुपूर्द केली. माजी विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ आणि शिक्षक एकत्र आले, तर कोणत्याही शाळेचा कायापालट होऊ शकतो, हे शिंदेवाडी शाळेने संपूर्ण तालुक्याला दाखवून दिले असल्याचे कौतुकही त्यांनी यावेळी केले.

या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मालपाणी नर्सरी यांच्याकडून देणगी स्वरूपात मिळालेल्या वृक्षांचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. केवळ वृक्षारोपण न करता, प्रत्येक विद्यार्थी आणि पालकाने एका झाडाचे पालकत्व स्वीकारून त्याच्या संगोपनाची कायदेशीर जबाबदारी घेतली आणि तशी शपथही घेतली.

या उपक्रमाचे कौतुक करताना शिक्षण विस्तार अधिकारी अनिल गायकवाड म्हणाले की, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण काळाची गरज आहे. भविष्यात जर आपल्याला सुखी आणि निरोगी आयुष्य जगायचे असेल, तर 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश प्रत्येकाने अंगीकारायला हवा.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शाळेच्या उपक्रमशील मुख्याध्यापिका वृषाली कडलग यांनी शिंदेवाडी शाळेच्या आतापर्यंतच्या प्रगतीचा आणि कायापालटाचा सविस्तर आढावा घेतला.

या सोहळ्यात शाळेला वस्तू स्वरूपात, रोख देणगी आणि विशेष निधीच्या माध्यमातून मदत करणाऱ्या सर्व दानशूर दात्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी अरविंद आहेर, राजाराम आहेर, शिक्षण तज्ञ दत्तात्रय हांडे, संतोष भालेराव, गणेश भालेराव, श्रीकांत खतोडे, विशाल आंबरे, रावसाहेब दातीर, आकाश आंबरे, योगेश दातीर, आदींसह पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**पाहिजेत**
पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
- संपर्क -
8888808397

**पाहिजेत**
मॉम-एबल फर्टिलिटी अँड आयव्हीएफ सेंटर, संगमनेर
आरएमओ (महिला) - १
शैक्षणिक पात्रता : BAMS / BHMS
नर्सिंग स्टाफ (रात्रपाळी) - १
हाऊसकीपिंग मावशी - २
घर कामासाठी मावशी - १
(सकाळी ९ ते सायंकाळी ५)
— संपर्क —
9860477807

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**
सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क- जाधव सोनोग्राफी सेंटर मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849







**पाहिजेत**
हिशोब करण्याकरिता दोन मुले पाहिजे
(कॉम्प्युटर येणे आवश्यक)
ए. जी. एस. टोमॅटो सप्लायर्स
टोमॅटो मार्केट यार्ड, संगमनेर
दुकान क्रमांक : १२३४५
7741816770
9763531663

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**
ड्रायव्हर - २ (एल.एम.व्ही.)
क्लर्क - २ (पदवीधर )
अकाउंटट - २ (टॅली)
कॅाम्प्युटर ऑपरेटर -२ पदवीधर
डॉ. इथापे हॉस्पिटल, संगमनेर
9822791484
9518556933
9370017177

**ड्रायव्हार पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअरल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
- संपर्क -
9117175050

# वांगचूक यांचे उपोषण सुरूच

## सोमवारी संसदेला घेराव, सरकार अजूनही शांत



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

शिक्षणतज्ज्ञ आणि हवामान कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचे अनिश्चितकालीन उपोषण शुक्रवारी २० व्या दिवशी पोहोचले. वांगचुक म्हणाले की, ते कोणत्याही परिस्थितीत २० जुलैपर्यंत जिवंत राहतील. डॉक्टरांनी इशारा दिला आहे की, दीर्घ उपवासामुळे त्यांची प्रकृती गंभीर झाली आहे आणि अवयवांना हानी पोहोचण्याचा धोका आहे.

जंतर-मंतरवर परीक्षेत कथित अनियमिततांबाबत 'कॉकरोच जनता पार्टी' चे आंदोलन २८ व्या दिवशीही सुरू राहिले. वांगचुक यांनी समर्थकांना २० जुलै रोजी संसदेपर्यंत होणाऱ्या शांततापूर्ण मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, ते लोकशाहीच्या मंदिरात आपली बाजू मांडतील. वांगचुक म्हणाले की, ते बाहेरून कमकुवत असले तरी आतून मजबूत आहेत. त्यांनी मस्करीत म्हटले की, जर २० जुलैचा मोर्चा यशस्वी झाला नाही, तर ते भूत बनून परत येतील. सरकारने कोणतीही प्रतिक्रिया न देईपर्यंत त्यांनी उपोषण संपवण्यास नकार दिला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने अधिकाऱ्यांना त्यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. याच दरम्यान, एएसआयए ने सांगितले की त्यांचे सदस्य नेहा, मनीष आणि आमीन यांची प्रकृतीही गंभीर आहे. आमीनला निर्जलीकरणामुळे हायपोव्होलेमिक शॉकचा धोका आहे, नेहाची रक्तातील साखर ४९ ास/वङ पर्यंत खाली आली आहे आणि मनीषचे वजन १० टक्क्यांहून अधिक कमी झाले आहे. हे विद्यार्थी वांगचुक यांच्यासोबत एकजूटता दर्शवत आहेत.

# राजूर पोलिसांची धडक कारवाई : बनावट व प्रतिबंधित दारूसह ६.६४ लाखांचा मुद्देमाल जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर -राजूर पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे धाडसी कारवाई करत बनावट तसेच राज्यात विक्रीस बंदी असलेल्या विदेशी मद्याचा मोठा साठा जप्त केला आहे. या कारवाईत चारचाकी वाहनासह एकूण ६ लाख ६४ हजार ३३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांना गुरुवारी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास गुप्त बातमीदारामार्फत राजूर येथील वंजार गल्ली परिसरात एका चारचाकी वाहनातून अवैध दारूचा साठा आणल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस कॉन्स्टेबल सचिन शिंदे, वाय. एन. जाधव, डी. डी. परते आणि एस. वाय. रत्नपारखी यांच्या पथकासह दोन शासकीय पंचांना घेऊन घटनास्थळी छापा टाकण्यात आला.

कारवाईदरम्यान एमएच-०३ एआर-०१९४ क्रमांकाचे वाहन आढळून आले. चौकशीअंती हे वाहन सोनू दिलीप मुर्तडक (वय २८) याच्या मालकीचे असल्याचे निष्पन्न झाले. वाहनाची पंचांसमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये १ लाख ६४ हजार ३३५ रुपयांच्या विविध कंपन्यांच्या मद्याच्या बाटल्या आढळून आल्या. तपासात काही मद्य बनावट असल्याचे, तर काही मद्य महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधित असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाले. त्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पोलीस निरीक्षक सावखेडकर यांच्याशी संपर्क साधून त्यांना राजूर पोलीस ठाण्यात पाचारण केले. त्यांच्या उपस्थितीत पंचनामा करून संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला. रासायनिक तपासणीसाठी प्रत्येक प्रकारातील तीन बाटल्या नमुन्यादाखल घेण्यात आल्या असून, त्यापैकी एक नमुना नाशिक येथील रासायनिक विश्लेषक प्रयोगशाळेत (अनालायझर) पाठविण्यात येणार आहे.



या प्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ तसेच भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी दिली.

राजूर पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध मद्यव्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, परिसरात पोलिसांच्या कार्यवाहीचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.

# ख्रिस्ती धर्माच्या बदनामीचे षड्यंत्र थांबवावे

## ख्रिस्ती मिशन चर्च बचाव समितीची मागणी



युवावार्ता(प्रतिनिधी)

श्रीरामपूर - सध्या महाराष्ट्रातच नव्हे तर एकूणच देशामध्ये ख्रिस्ती धर्म आणि ख्रिस्ती समाजावर अन्याय, अत्याचाराच्या व बदनामीच्या घटना वाढत आहेत. सदर घटनांना आळा बसावा, त्या पुर्णतः थाब्रविल्या जाव्यात याबाबत अप्पर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांना ख्रिस्ती मिशन चर्च बचाव समितीच्या वतीने नुकतेच निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की,समाज माध्यमातून समजलेल्या माहितीनुसार श्रीरामपूर येथे घडलेल्या कथित धर्मांतर प्रकरणातील आरोपी मोहन आडांगळे व व्यंकटेश अडांगळे यांनी एका पीडित मुलीला बळजबरीने चर्च मधले पाणी पाजून, तिला ख्रिस्ती धर्माचे पालन करण्याकरिता, बायबलच्या पाया पडायला सांगितले व तिचा विनयभंग केला. असे वृत्त कोणतीही शहानिशा न करता प्रसृत करण्यात आले.

वस्तुतः उपरोक्त उल्लेखित दोनही आरोपी हे ख्रिश्चन नाहीत. याउपरांत वृत्त कथनात दाखविलेला प्रकार हा ख्रिस्ती धर्म किंवा धार्मिक विधीनुसार अशा प्रकारचे कोणतेही कृत्य केले जात नाही हे महत्त्वाचे आहे. ख्रिस्ती धर्माच्या नावाखाली असे कृत्य करणाऱ्या व्यक्तींची निखालस चौकशी होऊन योग्य ती कारवाई करावी. मात्र अशा प्रकारे ख्रिस्ती धर्माला बदनाम करण्याचे षड्यंत्र थांबवले जावे असेही निवेदनात म्हटले आहे.

तरीही वरील घटनेची सखोल चौकशी करून दोषी व्यक्तींवर कार्यवाही व्हावी. तसेच आरोप सिद्ध न झाल्यास आरोप करणारी व्यक्ती वा व्यक्तीसमुह यांना कायद्याने बाधित करण्यात यावे आणि ख्रिस्ती समाजाला न्याय द्यावा. अशी मागणी यावेळी सोमनाथ वाकचौरे यांचेकडे करण्यात आली .

यावेळी ख्रिस्ती मिशन चर्च बचाव समितीचे अध्यक्ष अनिल भोसले पा. पीटर बनकर, रेव्ह. राजेश कर्डक, पा. शैलेश अमोलिक, रेव्ह. ए. एस. अमोलिक, दीपक कदम, विजय बरसे, बाबासाहेब जाधव, विल्सन बोर्डे, प्रवीण शिंदे, सुरेश ठुबे, सुभाष खरात, सागर जोगदंड, विजय त्रिभुवन,रवींद्र लोंढे, फ्रान्सिस साळवे, कार्तिक चांदेकर, सुनील तोरणे, एस. पी. पंडित, प्रकाश निकाले, अजय गायकवाड, सुधीर बारस्कर, बबन जाधव आदीसह मोठ्या संख्येने ख्रिस्ती बांधव उपस्थित होते.

# शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी २२ जुलैपर्यंत मुदतवाढ - कोरगंटीवार

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - समाज कल्याण आयुक्तालयामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शासकीय वसतिगृहातील प्रवेश प्रक्रियेसाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. इयत्ता ११ वी, १२ वी तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना आता २२ जुलै २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहेत. विद्यार्थ्यांनी या वाढीव मुदतीचा लाभ घेऊन वेळेत अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रविण कोरगंटीवार यांनी केले आहे.

यापूर्वी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ जुलै २०२६ निश्चित करण्यात आली होती. मात्र अनेक विद्यार्थी, विद्यार्थी संघटना तसेच क्षेत्रीय कार्यालयांकडून अर्ज करण्यासाठी मुदतवाढ मिळावी, अशी मागणी समाज कल्याण आयुक्तालयाकडे करण्यात आली होती. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी या मागण्यांचा विचार करून आयुक्तालयाने प्रवेश अर्जासाठी अतिरिक्त मुदत देण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, शालेय विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृह प्रवेश अर्जाची मुदत यापूर्वीच संपलेली असून त्यामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही, असेही समाज कल्याण विभागाने स्पष्ट केले आहे.

समाज कल्याण आयुक्तालयाने याबाबत अधिकृत परिपत्रक जारी केले असून, ऑनलाईन पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांची छाननी संबंधित यंत्रणांनी २४ जुलै २०२६ पर्यंत तातडीने पूर्ण करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

## दिनविशेष

६४: रोम, इटली — भीषण आग लागुन जवळजवळ सगळे शहर भस्मसात झाले.
१९८०: रोहिणी-१ — भारतीय उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण.
१९७६: नादिया कोमानेसी — यांनी ऑलिम्पिक स्पर्धेतील जिम्नॅस्टिक्स खेळात पहिल्यांदा १० पैकी १० गुण मिळवले.
१९६८: इंटेल (Intel) — कंपनीची स्थापना.
१९२५: माइन काम्फ — ॲडॉल्फ हिटलर यांचे आत्मचरित्रात्मक पुस्तक प्रकाशित.
१८५७: मुंबई विद्यापीठा — स्थापना.
१८५२: इंग्लंड — देशात निवडणुकीत गुप्त मतदान करण्यास सुरूवात झाली.

## जन्म

१९८२: प्रियांका चोप्रा — भारतीय अभिनेत्री आणि मिस वर्ल्ड २००० पीजेन्ट — पद्मश्री, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार
१९७२: सौंदर्या — अभिनेत्री (निधन: १७ एप्रिल २००४ )
१९७१: सुखविंदर सिंग — भारतीय गायक आणि अभिनेते — राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार
१९५०: रिचर्ड ब्रॅन्सन — व्हर्जिन ग्रुपचे स्थापक
१९३५: जयेंद्र सरस्वती — ६९वे शंकराचार्य
१९२७: मेहदी हसन — पाकिस्तानी गझलगायक गझलसम्राट (निधन: १३ जून २०१२ )
१९२१: जॉन ग्लेन — अमेरिकन मरीन कॉर्प्स एव्हिएटर, अंतराळवीर, पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालणारे पहिले अमेरिकन व्यक्ती (निधन: ८ डिसेंबर २०१६ )
१९१८: नेल्सन मंडेला — अफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष, क्रांतिकारी — भारतरत्न, नोबेल पुरस्कार
१९१०: दप्तेंद प्रमानिक — भारतीय उद्योजिका (निधन: १५ डिसेंबर १९८९ )
१९०९: बिश्नु डे — भारतीय कवी, समीक्षक आणि शैक्षणिक (निधन: ३ डिसेंबर १९८३ )
१८४८: डब्ल्यू. जी. ग्रेस — इंग्लिश क्रिकेटपटू (निधन: २३ ऑक्टोबर १९१५ )
१८१८: लुईस गेरहार्ड डी गेर — स्वीडन देशाचे पहिले पंतप्रधान (निधन: २४ सप्टेंबर १८९६ )
१५०१: ऑस्ट्रियाची इसाबेला — डॅनिश राणी (निधन: १९ जानेवारी १५२६ )

## मृत्यू

२००३: कुसय हुसेन — सद्दाम हुसेन यांचा मुलगा (जन्म: १७ मे १९६६ )
२००३: उदय हुसेन — सद्दाम हुसेन यांचा मुलगा (जन्म: १८ जून १९६५ )
१९९५: हेरॉल्ड लारवूड — इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: १४ नोव्हेंबर १९०४ )
१९८४: गजानन ठोकळ — साहित्यिक आणि प्रकाशक
१९३२: रेगिनाल्ड फेसेनडेन — कॅनेडियन-अमेरिकन शोधक, रेडिओ टेलिफोनीचे संस्थोधक (जन्म: ६ ऑक्टोबर १८६६ )
१९१८: इंद्र लाल रॉय — पहिल्या महायुद्धातील भारतीय पायलट (जन्म: २ डिसेंबर १८९८ )
१८२६: ज्युसेप्पे पियाझी — इटालियन खगोलशास्त्रज्ञ
१५४०: जॉन झापोल्या — हंगेरीचा राजा





## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**१८ जुलै**

## वर्णभेदाविरुद्ध आयुष्यभर लढलेले नेल्सन मंडेला

नेल्सन मंडेला हे दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदविरोधी चळवळीचे महान नेते, मानवाधिकारांचे पुरस्कर्ते आणि जगभरातील स्वातंत्र्य व लोकशाहीचे प्रेरणास्थान होते. १८ जुलै १९१८ रोजी दक्षिण आफ्रिकेतील म्वेझो येथे त्यांचा जन्म झाला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी आफ्रिकन नॅशनल काँग्रेस (ANC) मध्ये प्रवेश करून वर्णभेदाच्या अमानुष धोरणाविरुद्ध संघर्ष सुरू केला.१९६४ मध्ये त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आणि त्यांनी २७ वर्षे तुरुंगवास भोगला. मात्र या काळातही त्यांनी आपल्या विचारांशी तडजोड केली नाही. १९९० मध्ये त्यांची सुटका झाल्यानंतर त्यांनी सूडाऐवजी सामंजस्य, संवाद आणि राष्ट्रीय ऐक्याचा मार्ग स्वीकारला.१९९३ मध्ये नेल्सन मंडेला आणि एफ. डब्ल्यू. डी. क्लार्क यांना संयुक्तपणे नोबेल शांतता पुरस्कार प्रदान करण्यात आला. १९९४ मध्ये दक्षिण आफ्रिकेचे पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष म्हणून त्यांनी इतिहास रचला आणि लोकशाहीची मजबूत पायाभरणी केली.५ डिसेंबर २०१३ रोजी त्यांचे निधन झाले. "शिक्षण हे जग बदलण्याचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे," हा त्यांचा विचार




आजही जगाला प्रेरणा देतो. धैर्य, क्षमा, समानता आणि मानवतेचा संदेश देणारे नेल्सन मंडेला हे जागतिक इतिहासातील सर्वात प्रभावशाली नेत्यांपैकी एक म्हणून सदैव स्मरणात राहतील.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे : कष्टकऱ्यांचा आवाज

**पुण्यतिथी विशेष**

मराठी साहित्यात लोकजीवन, श्रमिकांचे प्रश्न आणि सामाजिक समतेचा आवाज प्रभावीपणे मांडणाऱ्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव अजरामर आहे. आपल्या लेखणीने आणि शाहिरीने त्यांनी समाजातील वंचित, कष्टकरी, शोषित आणि उपेक्षित घटकांचे जीवन वास्तववादी पद्धतीने मांडले. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, हे त्यांनी आपल्या लेखनातून सिद्ध केले.१ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे असे होते.अत्यंत गरिबीमुळे त्यांना औपचारिक शिक्षण घेता आले नाही. मात्र जीवनाच्या शाळेतून त्यांनी अनुभवांचे शिक्षण घेतले.



उदरनिर्वाहासाठी ते मुंबईत आले आणि हमालीसह अनेक कष्टाची कामे केली. याच संघर्षमय जीवनातून त्यांच्या साहित्याला वास्तवाची धार मिळाली.अण्णाभाऊ साठे यांनी ३५ हून अधिक कादंबऱ्या, १३ कथासंग्रह, अनेक पोवाडे, लावण्या, लोकनाट्ये आणि शाहिरी रचना लिहिल्या. त्यांची 'फकिरा' ही कादंबरी मराठी साहित्यातील मैलाचा दगड मानली जाते. या कादंबरीला १९६१ मध्ये महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार मिळाला. त्यांनी साहित्याच्या माध्यमातून अन्याय, विषमता, जातिभेद आणि शोषणाविरुद्ध प्रखर आवाज उठवला.संयुक्त महाराष्ट्र चळवळ, कामगार चळवळ आणि सामाजिक न्यायाच्या लढ्यांमध्येही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या शाहिरीने जनजागृती केली आणि लाखो सामान्य माणसांना संघर्षाची प्रेरणा दिली. "पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नाही, तर कष्टकऱ्यांच्या तळहातावर पेललेली आहे," हा त्यांचा विचार आजही समाजाला प्रेरणा देतो.अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे अनेक भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये भाषांतर झाले असून, त्यांच्या 'फकिरा' कादंबरीला जागतिक स्तरावरही मान्यता मिळाली. १८ जुलै १९६९ रोजी त्यांचे निधन झाले. मात्र त्यांचे साहित्य, शाहिरी आणि सामाजिक समतेचा संदेश आजही तेवढाच जिवंत आहे. मराठी साहित्यविश्वात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे कष्टकरी, वंचित आणि सामान्य माणसाच्या अस्मितेचे चिरंतन प्रतीक म्हणून सदैव स्मरणात राहतील.

पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी क्लॉथ सेंटर सिल्क अँण्ड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपूर फायदा देणारा सेल (संपूर्ण ए.सी. शोरूम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# दिल्लीच्या उपराष्ट्रपती भवनामध्ये... श्याम जाजू यांच्या पुस्तकाचे लोकार्पण






युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे १०० वर्षाची वाटचाल यशस्वीते कडे जात असताना विविध प्रकारची पुस्तके साहित्य व इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून प्रचार व प्रसार देशभरात होत आहेच. घरोघरी पोहोचून पत्रके वितरित करून सर्व क्षेत्रातून संमेलने आयोजित करून जनतेशी संवाद साधत प्रबोधनाचे काम व्यापक प्रमाणात होत आहे.

दिल्ली येथील उपराष्ट्रपती भवनात भाजपाचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष व संगमनेरचे सुपुत्र शाम जाजू यांनी 'ठडड१०० एक सदी संकल्पकी' या हिंदी व इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन होत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या इतिहासात प्रथमच अशा प्रकारचे आयोजन उपराष्ट्रपती भवनात होत आहे. उपराष्ट्रपती श्री सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते होणाऱ्या प्रकाशन समारंभाची अध्यक्षता संरक्षणमंत्री भारत सरकार श्री राजनाथ सिंहजी करणार आहेत. दिल्लीच्या मुख्यमंत्री श्रीमती रेखा गुप्ता तसेच ज्येष्ठ पत्रकार, इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्राचे अध्यक्ष पद्मश्री रावबहादूर राय यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न होणार आहे. पंचायत निरंजन आखाड्याचे महामंडलेश्वर श्री कैलाशानंदजी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे क्षेत्रीय संघचालक श्री पवन जिंदलजी यांचे ही सानिध्य या कार्यक्रमास लाभणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षाच्या वाटचालीचा, आव्हानांचा, संकल्पाचा, आढावा या पुस्तकात घेण्यात आला आहे. देशाचे नेतृत्व करणारे यशस्वी प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदीजींचाही स्वयंसेवकत्वाचा अध्याय या पुस्तकात समाविष्ट आहे. प्रभात प्रकाशनाने हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे.

# गरीबांना वेठीस धरून अतिक्रमणाचा प्रश्न सुटणार नाही : आ. अमोल खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान सर्वसामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार अमोल खताळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने शहराचा विकास करताना सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचाही विचार करणे आवश्यक असून, गरीबांना वेठीस धरून अतिक्रमणाचा प्रश्न सुटणार नाही किंवा शहराचा विकास साधता येणार नाही, असे परखड मत आमदार अमोल खताळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

आमदार खताळ म्हणाले की, हातावर पोट असलेले अनेक नागरिक छोट्या व्यवसायाच्या माध्यमातून स्वत:चा आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. अशा नागरिकांवर अचानक



अतिक्रमण हटाव कारवाई करण्यात आल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. संबंधितांना त्यांचे साहित्य सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी पुरेसा वेळ देणे ही नगरपालिका प्रशासनाची जबाबदारी होती. मात्र कोणतीही पुरेशी मुदत न देता थेट कारवाई करण्यात आल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले असून ही बाब अत्यंत दुर्दैवी असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न सोडविणे आवश्यक असले, तरी त्यासाठी मानवी दृष्टिकोन ठेवणे तितकेच महत्त्वाचे आहे. कायद्याची अंमलबजावणी करताना गरीब व सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय होणार नाही, याची प्रशासनाने विशेष काळजी घेतली पाहिजे. अतिक्रमण हटविण्यापूर्वी संबंधितांना लेखी सूचना देणे, साहित्य हलविण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध करून देणे तसेच आवश्यकतेनुसार पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देणे गरजेचे होते, असेही त्यांनी नमूद केले.

**संगमनेर शहराचा विकास हा सर्व घटकांना विश्वासात घेऊन आणि त्यांच्या हिताचा विचार करूनच झाला पाहिजे. सर्वसामान्य नागरिकांच्या उदरनिर्वाहावर गदा आणून विकास साधणे योग्य ठरणार नाही. भविष्यात अशा प्रकारच्या कारवायांमध्ये प्रशासनाने अधिक संवेदनशीलता, योग्य नियोजन आणि मानवी मूल्यांचा विचार करून निर्णय घ्यावेत.**

**आ. अमोल खताळ**

# चंदनापुरी घाटातील तुटलेल्या संरक्षक जाळ्यांमुळे वाढला धोका; तातडीने उपाययोजना करा - पवार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील चंदनापुरी घाटात संरक्षक लोखंडी जाळ्यांची झालेली दुरवस्था प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी गंभीर धोका निर्माण करत आहे. घाटाच्या दोन्ही बाजूंच्या डोंगरांवर बसविण्यात आलेल्या अनेक लोखंडी जाळ्या तुटल्या असून त्यामध्ये मोठमोठे दगड अडकून पडले आहेत. मुसळधार पावसामुळे हे दगड केव्हाही महामार्गावर कोसळून भीषण अपघात घडू शकतो. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने अडकलेले दगड हटवून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अन्यथा जनतेसह रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार यांनी दिला आहे.

कपिल पवार यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, चंदनापुरी घाट सुरू झाल्यापासून येथे वारंवार दरडी कोसळण्याच्या घटना घडत



आहेत. अनेक वेळा मोठमोठे दगड थेट महामार्गावर आल्याने वाहनचालकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. सुदैवाने आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झालेली नसली, तरी प्रत्येक वेळी मोठी दुर्घटना थोडक्यात टळली आहे.

काही दिवसांपूर्वीही घाटात दरड कोसळून मोठे दगड महामार्गावर आले होते. त्या वेळी वाहनांची वर्दळ कमी असल्याने अनर्थ टळला. मात्र, सध्या सुरू असलेल्या पावसामुळे डोंगरांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी झिरपत असून माती व खडक सैल झाले आहेत. परिणामी तुटलेल्या जाळ्यांमध्ये अडकलेले मोठे दगड अधिक धोकादायक बनले असून ते केव्हाही जाळ्या फोडून रस्त्यावर कोसळण्याची शक्यता आहे. पवार यांनी संबंधित विभागाला तातडीने जाळ्यांमध्ये अडकलेले दगड हटविणे, सैल झालेले खडक काढून टाकणे आणि दरड कोसळण्याचा कायमस्वरूपी धोका टाळण्यासाठी शास्त्रोक्त व प्रभावी उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे. घाटाच्या निर्मितीवेळी दीर्घकालीन सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे आजही वारंवार दरडी कोसळण्याच्या घटना घडत असल्याचा आरोपही त्यांनी केला..

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
कर्ज रक्कम वाढ । कर्ज व्याजदर कमी । कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
अत्याधुनिक लॉमिनार शस्त्रक्रिया ऑपरेशन थिएटर
मेंदुविकार शस्त्रक्रिया
खुबा प्रत्यारोपण
गुडघा प्रत्यारोपण
पोटाच्या शस्त्रक्रिया
किडनी शस्त्रक्रिया
मुत्रविकार शस्त्रक्रिया
दुर्बिणीद्वारे पोटाच्या व आतड्याच्या शस्त्रक्रिया
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८२७०३८२

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू । कांजीवरम । सिल्क पैठणी । बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर
422605

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25